वाचा : १. शासन निर्णय,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,क्रमांक : प्राशाअ-२०१३/(१२४/२०१३)/प्राशि-३, दिनांक २५ जुन २०१३.

२. मा.शिक्षण उपसंचालक,औरंगाबाद विभाग,औरंगाबाद यांचे आदेश जाक्र./प्रावि-२/२०१३-१४/अनुदान/२७३५३/६५,दिनांक १० डिसेंबर २०१३.

३. शासन निर्णय,क्रमांक : प्राशाअ-१२१०/(६३३/१०)/प्राशि-३,दिनांक १२ ऑक्टोबर २०१०.

४. तपासणी अधिकारी यांचा तपासणी अहवाल.

..................................................***********..................................................

जा.क्र.जिपऔ/शिक्षण/प्रावि-३/२०१३-२०१४/1146-नं

कार्यालय जिल्हा परिषद,औरंगाबाद.

दिनांक. 26-03-2014

**आदेश :**

वरील संदर्भिय १ व २ अन्वये खालील प्राथमिक शाळेला त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे जुन २०१२ पासून २०% अनुदानाचा टप्पा व संदर्भिय ३ अन्वये दिलेल्या अधिकारानुसार खालील प्राथमिक शाळेला त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे सन २०१३-२०१४ साठी वाढीव टप्पा अनुदान चे आदेश संदर्भिय ४ च्या तपासणी अधिकारी यांच्या शिफारशीनुसार व शासन निर्णय क्रमांक : माशाअ २००९/(५९९/०९)/माशि-१,दिनांक १५ नोव्हेंबर २०११ मधील निकष,अटी व शर्तीनुसार अधीन राहून घोषीत करण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे व शाळेचे नाव व संपुर्ण पत्ता | माध्यम | अनुदानास पात्र असलेला वर्ग / तुकडी | अनुदानास पात्र ठरलेल्या वर्ग /तुकडीस जुन २०१२ पासून द्यावयाचा अनुदानाचा टप्पा | सन २०१३-२०१४ चा मंजूर केलेला टप्पा | मंजूर पदे | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | डी.एड. | पदवीधर | एकुण पदे |
| १ | सहारा शिक्षण प्रसारक मंडळ, एफ-०१,प्लॉट नं-ए-६९,एन-४, सिडको,औरंगाबाद संचलित **जयभद्रा प्राथमिक विद्यामंदीर.** राजंणगांव(शेणपुंजी),ता.गंगापूर, जि. औरंगाबाद. | मराठी | इयत्ता १ली ते ७वी प्रथम वर्ग<br>इयत्ता १ली ते ४थी दुसरी तुकडी | २०% | ४०% | ११ | ०१ | १२ |

**टिप :**

१. सदर आदेशान्वये अनुदानास पात्र म्हणून घोषित करण्यात आलेले वर्ग अनुदानासाठी पात्र ठरविण्यात आले असलेतरी त्यास अनुदानाचा हक्क प्राप्त होत नाही.संबंधीत वर्गांना अनुदान लागू करणे हा शासनाचा स्वेच्छाधिकार असून निधीच्या उपलब्धेनुसार शासनाकडून निकषपात्र वर्गांना अनुदान उपलब्ध करुन देण्यात येईल.सदर अनुदान हे भूतलक्षी प्रभावाने लागू असणार नाही.

२. सदरील शाळेतील अनुज्ञेय शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक मान्यता,सेवासातत्य देण्यात आल्या आहेत.दिलेल्या मान्यतांबाबत तक्रारी नाहीत इत्यादी बाबी विचारात घेवून सदरील अनुदानाचा टप्पा मंजूर करण्याचा प्रस्ताव आपण सादर केला असे गृहीत धरुन सदरील आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.या मान्यतांबाबत तक्रारी/अनियमितता आढळून आल्यास मुख्याध्यापक यांची वैयक्तिक जबाबदारी राहील याची नोंद घ्यावी.

प्रति,

अध्यक्ष/सचिव/मुख्याध्यापक
सहारा शिक्षण प्रसारक मंडळ,एफ-०१,प्लॉट नं-ए-६९,एन-४, सिडको,औरंगाबाद संचलित
**जयभद्रा प्राथमिक विद्यामंदीर.**
राजंणगांव(शेणपुंजी),ता.गंगापूर,जि. औरंगाबाद.

**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**जिल्हा परिषद,औरंगाबाद**

**प्रतिलिपी,**

१. मा.शिक्षण उपसंचालक,औरंगाबाद विभाग,औरंगाबाद यांना माहितीस्तव.

२. अधिक्षक,वेतन पथक (प्राथमिक)जिल्हा परिषद,औरंगाबाद यांना माहितीस्तव.

**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**जिल्हा परिषद,औरंगाबाद**